# मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर व शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जि. प. कोल्हापूर यांचे वतीने माध्यमिक शाळा संस्था चालक(कोल्हापूर जिल्हा) कार्यशाळा दिनांक १६/०२/२०१०

-- -- -- --

**<u>सेवक निश्चिती</u>**

माध्यमिक शाळा संहिता ५७-१ ते ६६ अन्वये मान्यताप्राप्त अनुदानित, विना अनुदानित, अंशतः अनुदानित, कायम विना अनुदानित माध्यमिक शाळेत पुरेसा सेवक वर्ग ठेवण्याची जबाबदारी व्यवस्थापना मंडळाची आहे.

**<u>पदनिमिर्ती</u>**

नव्याने मान्यता मिळालेल्या शाळेस इ. ८वी ते इ. १०वी साठी प्रत्येक तुकडीस १.५ व इयत्ता ५वी ते ७वी तुकडीस १.३ या प्रमाणात शिक्षक पदे अनुज्ञेय आहेत. तथापि, संच निश्चिती करता इ. ५वी ते ७वी च्या एकूण तुकडयांचा कार्यभार गणना करुन म्हणजेच प्रत्येक तुकडीस २५ तास कार्यभार धरुन व इ. ८वी ते १०वी च्या तुकडींना २६ तास ४५ मिनिटे कार्यभार धरुन गणना केली जाते. यामध्ये इ. ९वी व इ. १०वी च्या वर्गांना प्रत्येक तुकडीस किमान ४० विद्यार्थी असतील तर कार्यानुभव विषयाचा अतिरिक्त कार्यभार प्रत्येक तुकडीस १ तास दिला जातो. इ. ८वी ते १०वीच्या तुकडीत ५१ किंवा ५१ पेक्षा जास्त पट असल्यास १ तास ३० मिनिटे इर इ. ५वी ते ७वी च्या तुकडीस १ तास २० मिनिटे अतिरिक्त कार्यभार मिळतो. तसेच इ. ८वी ते १०वी च्या तुकडीस पटसंख्या ३० किंवा ३० पेक्षा कमी झाल्यास १ तास ३० मिनिटे व ५वी ते ७वी च्या तुकडीस १ तास २० मिनिटे कार्यभार कमी होतो.

तथापि वरील कांही कारणामुळे पद संख्येत वाढ झाल्यास ती पायाभूत पदामध्ये वाढ झाली आहे. असे समजून शासनाच्या मान्यतेशिवाय पदावर नियुक्ती करता येणार नाही. शासनाने सन २००१-०२ मध्ये शाळानिहाय जी पदे विहीत कार्यभारानुसार मान्य केली आहेत. ती त्या शाळेची पायाभूत पदे मानली आहेत.

परंतू एकाद्या शाळेस समायोजनाने तुकडी मिळाली असल्यास व त्यामुळे पायाभूत पदामध्ये वाढ होत असल्यास त्यास शासनाची मंजूरी आवश्यक नाही.

## कर्मचारी भरती

शाळेमध्ये पुढील पैकी कोणत्याही एका कारणाने मान्य पदा रिक्त होवून शकते, (१) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती (२) स्वेच्छासेवानिवृत्ती (३) राजीनामा (४) मृत्यू (५) बडतर्फी इत्यादी

वरीलपैकी कोणत्याही कारणाने शिखक कर्मचा-यांची नियुक्ती करतांना सक्षम प्राधिका-यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. प्रथम रिक्त पदावर भरती करताना जाहिरात परवानगी घेणे आवश्यक असून शिक्षणाधिकारी(माध्यमिक) यांची परवानगी घेताना खालीलप्रमाणे प्रस्ताव पाठविणे आवश्यक आहे.

१) पद रिक्त होण्याचे कारण
२) सदर नियुक्ती मुलाखत घेवून करण्यात असल्याबाबतचे हमीपत्र
३) मा. आयुक्त, मागासवर्ग कक्ष, पुणे यांचेकडून तपासून घेतलेल्या अनुशेष नोंदवही उता-यांची प्रत
४) शाळांचे संच मान्यता प्रपत्र
५) संस्थेत शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी अतिरिक्त नाहीत याबाबतचे प्रमाणपत्र
६) न्यायालयीन वाद नसलेबाबत संस्थेचे हमीपत्र
७) जाहिरात कोणत्या दैनिकात देणार आहात याबाबत स्पष्टता
८) डी. एड. श्रेणीतील शिक्षक सेवाजेष्ठता यादी
९) जाहिरात नमुन्यामध्ये विषयांची स्पष्टता
१०) जाहिरात देणारे कार्यकारी मंडळ अधिकृत असल्याचे रु. २०/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र
११) नवीन नियुक्ती संदर्भात या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र
१२) शैक्षणिक कागदपत्रे
१३) संस्था ठराव, संस्था आदेश, रूजू अहवाल
१४) संबधित उमेदवार नोकरी मागणी अर्ज
१५) समाज कल्याण, सेवायोजन कार्यालय व आदिवासी विकास कार्यालयाकडून नांवे मागविणेत आलेबाबतचा पत्रव्यवहार

## शिक्षकेत्तर कर्मचारी भरती -

शिक्षकेत्तर कर्मचारी भरतीबाबत शासनाने वेळोवेळी निर्णय घेतले आहेत. माध्यमिक शाळा संहिता मधील तरतूदीनुसार चिपळूणकर समितीच्या शिफारसी स्विकारुन शासनाने शिक्षकेत्तर कर्मचारी पदांना मान्यता दिलेली आहे. २५ नोव्हेबर, २००५ रोजी शासनाने खाजगी अंशत:/पूर्णत:/अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व सैनिक शाळांसाठी शिक्षकेत्तर पदे अनुज्ञेय करायाकरिता सुधारित निकष शासन निर्णयाद्वारे

विहित केले आहेत. सदर निकषानुसार शाळेमध्ये विविध पदे मान्य होतात. तथापि पुनःश्च शासनाने वेळोवैही शासन निर्णयाने सदर निर्णयास स्थगिती दिल्याचे दिसून येते.

६ फेब्रुवारी, २००९ च्या शासन निर्णयानुसार शासनाने शासन निर्णय दि. २५/११/२००५ इव माध्यमिक शाळा संहितामधील निकषानुसार या दोन्ही मध्ये देय व अनुज्ञेय पदे ठरत असतील व ती पदे मंजूर व रिक्त असतील तर ती मंजूर असलेली रिक्त पदे भरण्यास व भरलेल्या पदांना मान्यता देण्यास शासनाची मान्यता मिळाली. दिनांक १०/११/२००९ च्या शासन निर्णया दि. २५/११/२००५ च्या शासन निर्णयानुसार शिक्षकेत्तर पदे भरण्यास मान्यता देणेत आलेली आहे. तथापि, दि. २५/११/२००५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर शासन निर्णयानुसार अनुज्ञेय ठरणा-या पदांबाबत एकत्र प्रस्ताव मा. शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे शासनास सादर करणे आवश्यक आहे. शासनास एकत्र प्रस्ताव प्राप्त झालेनंतर शासन या पदासाठी अर्थसंकल्पिक तरतूद करुन पदांना मंजूरी घेईल व मंजूर पदे शिक्षण संचालक यांचकडे पाठविली जातील. त्यानंतर मा. शिक्षक संचालक या पदांचे वाटप जिल्हानिहाय शिक्षणाधिकारी(माध्यमिक) यांचेकडे करतील. त्यानंतर दि. २५/११/२००५ मधील शासन निर्णयानुसार **अ** प्रपत्राकानुसार अतिरिक्त शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे समायोजन करण्यात येईल. अतिरिक्त शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे समायोजन झालेशिवाय शिक्षकेत्तर पदे भरता येणार नाहीत.

<u>वैयक्तिक मान्यतेसाठी शिक्षकेत्तर पदे भरण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे</u>

१) पद रिक्त होण्याचे कारण
२) सदर नियुक्ती मुलाखत घेवून करण्यात असल्याबाबतचे हमीपत्र
३) मा. आयुक्त, मागासवर्ग कक्ष, पुणे यांचेकडून तपासून घेतलेल्या अनुशेष नोंदवही उता-यांची प्रत
४) शाळांचे संच मान्यता प्रपत्र
५) संस्थेत शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी अतिरिक्त नाहीत याबाबतचे प्रमाणपत्र
६) न्यायालयीन वाद नसलेबाबत संस्थेचे हमीपत्र
७) जाहिरात कोणत्या दैनिकात देणार आहात याबाबत स्पष्टता
८) शिक्षकेत्तर कर्मचारी सेवाजेष्ठता यादी
९) जाहिरात नमुन्यामध्ये सर्व मुद्दांची स्पष्टता
१०) जाहिरात देणारे कार्यकारी मंडळ अधिकृत असल्याचे रु २०/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र
११) नवीन नियुक्ती संदर्भात या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र
१२) शैक्षणिक कागदपत्रे
१३) संस्था ठराव, संस्था आदेश, रूजू अहवाल
१४) संबधित उमेदवार नोकरी मागणी अर्ज

१५) समाज कल्याण, सेवायोजन कार्यालय व आदिवासी विकास कार्यालयाकडून नांवे मागविणेत आलेबाबतचा पत्रव्यवहार
१६) जन्मतारखेचा दाखला
१७) उमेदवार अनुशेषातील असल्यास जातीचे जात पडताळणी प्रमाणपत्र
१८) मुलाखतीस बोलाविलेबाबत कागदपत्राचा पुरावा
१९) मुलाखतीस उपस्थित असलेल्या उमेदवारांचे हजेरीपत्र
२०) उमेदवारांना दिलेले गुणदान पत्रक
२१) मुख्याध्यापक यांचे कव्हलिंग लेटर
२२) प्रपत्र क्र. १ (एका प्रतित)
२३) वरील देणेत आलेली माहिती बरोबर असलेबाबत संस्था सचिव/अध्यक्ष, मुख्याध्यापक यांचे रु. ५०/- चे स्टॅम्प पेपरवर केलेले प्रतिज्ञापत्र

----------